भारतातील व्यापारी बँकांच्या अनिष्पादित मालमत्ता : एक तुलनात्मक अभ्यास

पी. बी. कदम व विजय मा. कुंभार
व्यावसायिक अर्थशास्त्र, विभाग, धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा

प्रस्तावना

भारतीय अर्थव्यवस्थेत सार्वजनिक, खाजगी व विदेशी बँकांनी अत्यंत महत्त्वाचे योगदान दिलेले असून शेती, व्यापार व उद्योग क्षेत्रास केलेल्या कर्जपुरवठ्यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासास मदत झालेली आहे परंतू आर्थिक विकासाच्या वाहिन्या असणाऱ्या व्यापारी बँकांना अनिष्पादित मालमत्तेच्या समस्येने ग्रासलेले आहे. देशातील शासन, भारतीय रिझर्व्ह बँक तसेच वैयक्तीक बँक व्यवस्थापनाने अवलंबलेल्या काही चुकीच्या धोरणामुळे व अकार्यक्षम वसुली यंत्रणेमुळे अनिष्पादित मालमत्तेची समस्या गंभीर बनलेली आहे (Shyamala, 2012; Bhavani Prasad and Veena,2011). सद्या भारतातील सार्वजनिक, खाजगी व विदेशी व्यापारी बँकामधील अनिष्पादित मालमत्ता बँक व्यवसायासमोरील महत्त्वाचे आव्हान बनलेले असून या समस्येचा तुलनात्मक अभ्यास व कारणमिमांस करण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात केलेला असून ही समस्या सोडवण्यासाठी व्यवहार्य उपाययोजनाही सुचवण्यात आलेल्या आहेत.

भारतीय अर्थव्यवस्थेतील बँकींग व्यवसायामध्ये विविध प्रकारच्या बँकींग संस्था कार्यरत आहेत. देशातील आर्थिक उलाढालींचा विचार करता सार्वजनिक व्यापारी बँका, खाजगी व्यापारी बँका व विदेशी व्यापारी बँकांचे योगदान सर्वात महत्त्वाचे आहे. सध्या भारतात अनुसुचित व्यापारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व बिगर अनुसुचित व्यापारी बँका त्यांच्या ९३,०८० (सन २०११) शाखांच्या माध्यमातून बँकींग व्यवसाय करत आहेत (RBI, 2010; RBI, 2011). भारतीय व्यापारी बँकांनी वित्तपूरवठ्याच्या माध्यमातून आर्थिक विकास प्रक्रियेत महत्त्वाचे योगदान दिलेले असले तरी भारतातील व्यापारी बँका कर्जवसुली कार्यात कमी पडत असल्याचे दिसून येत आहे. वाढत्या थकबाकीमुळे बँक ठेवीदारांचे हित धोक्यात येत आहे. सदर शोधनिबंधात अनिष्पादित मालमत्तेच्या समस्येचा तुलनात्मक अभ्यास करून निष्कर्ष व उपाययोजना मांडलेल्या आहेत.

१.उद्देश व अभ्यासपध्दती

सदर शोधनिबंधामध्ये भारतीय व्यापारी बँकांच्या अनिष्पादत मालमत्तेचा आढावा घेऊन सार्वजनिक व्यापारी बँका, खाजगी व्यापारी बँका व विदेशी बँकाच्या अनिष्पादित मालमत्तेचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे.

१. भारतीय व्यापारी बँकांच्या अनिष्पादत मालमत्तेतील बदलांचा अभ्यास करणे
२. भारतीय व्यापारी बँकांच्या अनिष्पादत मालमत्तेचा तुलनात्मक अभ्यास करणे
३. भारतातीय बँकांची प्रतिशाखा स्थुल अनिष्पादित मालमत्तेचा तुलनात्मक अभ्यास करणे
४. अनिष्पादत मालमत्तेची समस्या सोडवण्यासाठी व्यवहार्य उपाययोजना सुचवणे.

प्रस्तुत शोधनिबंधासाठी आवश्यक माहिती दुय्यम माहिती स्त्रोतांतून घेण्यात आलेली आहे. ही दुय्यम माहिती विविध प्रकारच्या नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन पत्रिकेतून घेण्यात आलेली आहे. तसेच काही माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेच्या विविध अहवालातुन व संकेतस्थळावरून घेण्यात आलेले आहेत.

२. भारतातील व्यापारी बँकांचा शाखा विस्तार

भारतीय अर्थव्यवस्थेत एकूण १७० व्यापारी बँका त्यांच्या ९३,०८० शाखांच्या माध्यमातून ठेवी संकलन, कर्जपूरवठा, गुंतवणक व इतर बँकींगविषयक कार्ये करत आहेत. सन २०११ अखेर ३३,६०२ बँक शाखा ग्रामीण भागात, २३०४८ शाखा अर्धनागरी भागात, १९१५६ शाखा नागरी भागात तर १७२७४ शाखा महाननगरामध्ये कार्यरत आहेत. भारतीय बँकींग व्यवसायामध्ये स्टेट बँक ऑफ इंडीया व तिच्या सलग्न बँकांना अनन्यसाधारण महत्त्व असून २०११ अखेर या बँकेच्या (SBI गट) १८,८२३ शाखा व इतर राष्ट्रीययकृत व्यापारी बँकाच्या ४५,८५० शाखा, प्रादेशिक ग्रामीण बँकाच्या १६,०३४, विदेशी बँकांच्या ३१९ शाखा, इतर अनुसुचित व्यापारी बँकाच्या ५३ शाखा कार्यरत आहेत(RBI, 2010; RBI, 2011).

कोष्टक क्र. १ भारतातील व्यापारी बँकांचा शाखा विस्तार			
	राष्ट्रीययकृत	खाजगी बँका	विदेशी बँका
२००४	४८३२८	५९५१	२२१
२००५	४९०२५	६४५४	२४२
२००६	५००१५	६८१९	२५९
२००७	५२०८८	७४२४	२७२
२००८	५५०८३	८३२४	२७९
२००९	५७८३१	९२४०	२९५
२०१०	६१६५३	१०४५२	३१०
२०११	६४६७३	१२००१	३१९

३. भारतातील व्यापारी बँकाची अनिष्पादीत मालमत्तेचे वर्गीकरण

भारतीय रिझर्व्ह बँकेने ठरवुन दिलेल्या नियमांनुसार व्यापारी बँकाच्या मालमत्ता (Assets), प्रमाणीत मालमत्ता (Standard assets), उपप्रमाणित मालमत्ता (Sub-standard), शंकास्पद मालमत्ता (Doubtful assets) व बुडीत मालमत्ता (Loss assets) या चार प्रकारामध्ये वर्गीकरण केले जाते. यामधील प्रमाणित मालमत्ता अधिक असणे व उपप्रमणित, शंकास्पद व बुडीत मालमत्तेचे प्रमाण कमीत कमी असणे बँकींग व्यवसायासाठी हितावह असते.

३.१ भारतातील सार्वजनिक बँकांची अनिष्पादीत मालमत्ता

भारतातील सार्वजनिक व्यापारी बँका शासकीय मालकीच्या बँका असल्यामुळे शासकीय ध्येय-धोरणानुसार शेती, उद्योग, व्यापार, ग्रामीण उद्योग, अग्रक्रम क्षेत्रास कर्जपूरवठा करीत असतात(Chakravarty, 1985; Shyamala, 2012). अग्रक्रम क्षेत्रासाठीची कर्जे काही वेळेस विनातारण दिलेली असल्यामुळे त्यामधील अनेक कर्जे बँकाना परत मिळू शकत नाहीत त्यामुळे सार्वजनिक बँकांची अनिष्पादीत मालमत्ता वाढलेली दिसून येत आहे (Siraj. K.K and Pillai, 2012; Reddy, 2002; Rajeev and Mahesh, 2010).

सन २००४ ते २००९ या काळातील सार्वजनिक व्यापारी बॅकांच्या स्थुल अनिष्पादित मालमत्तेत घट झालेली दिसून येत असली तरी सन २०१० ते २०११ या काळातील अनिष्पादित मालमत्तेत वाढ दिसून येत आहे २०११ मध्ये या बँकांच्या थकबाकीमध्ये ७१०४७ कोटी रू. पर्यंत वाढ झालेली आहे. त्यापैकी ५५१४ कोटी रू.ची कर्जे बुडीत कर्जे आहेत (कोष्टक क्र. २).

कोष्टक क्र. २ : सार्वजनिक व्यापारी बँकांची अनिष्पादीत मालमत्ता (कोटी रू.)							
वर्ष	उपप्रमाणित		शंकास्पद		बुडीत		स्थुल NPA
	रक्कम	(%)	रक्कम	(%)	रक्कम	(%)	रक्कम
२००४	१६९०९	२.६	२८७५६	४.३	५८७८	०.९	५१५४१
२००५	१०८३८	१.२	२९९८८	३.४	५७७१	०.७	४६५९७
२००६	११३९४	१.१	२४८०४	२.३	५१८१	०.५	४१३७९
२००७	१४१४७	१.०	१९९४४	१.५	४५१०	०.३	३८६०२
२००८	१६८७०	१.०	१९१६७	१.१	३७१२	०.२	३९७४९
२००९	१७५२१	०.९	२०७१५	१.०	३८०३	२.०	४४०३९
२०१०	२७६८८	१.१	२४६८५	१.०	४९२८	०.२	५७३०१
२०११	३३६१४	१.१	३१९१९	१.०	५५१४	०.२	७१०४७

(संदर्भ : Statistical Tables Relating to Bank in India, 2008-09, 2010-11)

३.२ भारतातील खाजगी व्यापारी बँकांची अनिष्पादित मालमत्ता

भारतीय बँकींग व्यवसायामध्ये खाजगी व्यापारी बँकांचेही योगदान महत्त्वाचे असून सध्या देशात ७ नवीन खाजगी व्यापारी बँका व १५ जुन्या खाजगी व्यापारी बँका कार्यरत असून कर्जवाटपामध्येही या बँकांनी महत्त्वाची भूमिका

पार पाडलेली आहे. भारतातील खाजगी बँकांना कर्जवाटपाबाबत तुलनात्मकदृष्ट्या स्वातंत्र्य असले तरीही या बँकांच्या कर्जाची वसूली १००% असल्याचे दिसून येत नाही.

कोष्टक क्र. ३ : खाजगी व्यापारी बँकांची अनिष्पादीत मालमत्ता (कोटी रू.)

वर्ष (मार्चअखेर)	उपप्रमाणित		शंकास्पद		बुडीत		स्थुल छझअ
	रक्कम	(%)	रक्कम	(%)	रक्कम	(%)	रक्कम
२००४	३१२७	१.८	६३९१	३.६	८२५	०.५	१०३४३
२००५	२२१३	१.०	५५७८	२.५	९००	०.४	८६९१
२००६	२३९६	०.८	४४३८	१.५	९४०	०.३	७७४४
२००७	४३६८	१.१	३९३०	१.०	९४१	०.२	८२४०
२००८	७२८०	१.५	४४५२	०.९	१२४४	०.३	८२९७६
२००९	१०५२६	२.०	५०१७	१.०	१३४५	०.३	१६८८७
२०१०	८६७६	१.५	६५४२	१.१	२१६६	०.४	१७३८४
२०११	४३९८	०.६	१०७३५	१.५	२८३९	०.४	१७९७२

(संदर्भ : *Statistical Tables Relating to Bank in India, 2008-09, 2010-11)*

सन २००४ ते २००९ या कालावधीत खाजगी व्यापारी बँकांच्या उपप्रमाणित मालमत्तेत १.८ टक्क्यावरून २.० टक्के पर्यंत वाढून सन २०१० ते २०११ या कालावधीत ते कमी झालेले आहे, तर शंकास्पद मालमत्ता ३.६ टक्केवरून १.५ टक्के तर बुडीत मालमत्ता ०.५ टक्केवरून ०.४ टक्केपर्यंत घटलेली आहे. स्थुल अनिष्पादित मालमत्तेमध्ये १०३४३ कोटी रू. वरून १७९७२ कोटी रूपयापर्यंत वाढ झालेली दिसून आहे तर बुडीत कर्जांची रक्कम ८२५ कोटी रू.वरून २८३९ कोटी रू. वर पोहचली आहे (कोष्टक क्र. ३).

३.३ भारतातील विदेशी व्यापारी बँकांची अनिष्पादित मालमत्ता

भारतीय अर्थव्यवस्थेत सन १९९१ नंतरच्या काळात परकीय किंवा विदेशी बँकांच्या संख्येत सतत वाढ होत असून सध्या ३१ विदेशी बँका कार्यरत आहेत. या बँकांही देशातील कर्जपुरवठा कार्यात महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. विदेशी बँका अधिक व्यावसायिक असल्या तरी याही बँकांना भारतात अनिष्पादित मालमत्तेच्या समस्येस सामोरे जावे लागत आहे.

कोष्टक क्र. ४ : विदेशी व्यापारी बँकांची अनिष्पादीत मालमत्ता (कोटी रू.)

वर्ष	उपप्रमाणित		शंकास्पद		बुडीत		स्थुलछझअ
	रक्कम	(%)	रक्कम	(%)	रक्कम	(%)	रक्कम
२००४	९९०	१.६	१०९९	१.८	९२४	१.५	३०१३
२००५	७१४	०.९	९७४	१.३	५६९	०.८	२२५७
२००६	९४६	१.०	६९८	०.७	४४६	०.५	२०९०
२००७	१३६७	१.१	६३१	०.५	४५४	०.४	२४५२
२००८	१९६३	१.२	७६८	०.५	३८७	०.२	३११७
२००९	५८७९	३.५	१००४	०.६	४१६	०.२	७२२९
२०१०	४९३०	२.९	१४४१	०.९	७५७	०.५	७१२८
२०११	१८६५	०.९	२११३	१.१	१०८७	०.५	५०६५

(संदर्भ : *Statistical Tables Relating to Bank in India, 2008-09, 2010-11)*

सन २००४ ते २००९ या कालावधीत भारतात बँकींग व्यवसाय करणाऱ्या विदेशी बँकांची स्थुल अनिष्पादित मालमत्ता ३०१३ कोटी रूपयांवरून ७२२९ कोटी रूपयांपर्यंत पोहचलेली आहे. परंतू सन २०१० ते २०११ या कालावधीत विदेशी बँकांची स्थुल अनिष्पादित मालमत्ता ७१२८ कोटी रूपयांवरून ५०६५ कोटी रूपयांपर्यंत कमी झालेले आहे. उपप्रमाणित मालमत्ता १.६ टक्केवरून ०.९ टक्केपर्यंत वाढलेली आहे. तर शंकास्पद मालमत्तेत ०.६ टक्केवरून व १.१ टक्केपर्यंत वाढ झालेली आहे व बुडीत मालमत्तेत १.५ टक्केवरून व ०.५ टक्केपर्यंत घट झालेली आहे (कोष्टक क्र. ४).

४. बँकांचा शाखाविस्तार व अनिष्पादित मालमत्ता यामधील सहसंबंध

भारतीय सार्वजनिक, खाजगी व विदेशी व्यापारी बँकाची संख्या, त्यांच्या शाखांची संख्या व त्यांच्या स्थुल अनिष्पादित मालमत्तेचा विचार करता भारतात कार्यरत असणाऱ्या विविध व्यापारी बँकांच्या शाखा, कर्जे व अनिष्पादित मालमत्ता यांची तुलना करता त्यामध्ये कमालीचे वैविध्य दिसून येते.

कोष्टक क्र. ५ : भारतातीय बँकांची प्रतिशाखा स्थुल अनिष्पादित मालमत्ता (कोटी रू.)

	राष्ट्रीययकृत बँका			खाजगी बँका			विदेशी बँका		
वर्ष मार्च आखेर	**शाखा**	**स्थुल NPA**	**प्रतिशाखा सरासरी NPA**	**शाखा**	**स्थुल NPA**	**प्रतिशाखा सरासरी NPA**	**शाखा**	**स्थुल NPA**	**प्रतिशाखा सरासरी NPA**
२००४	४८३२८	५१५४१	१.०६६	५९५१	१०३४३	१.७३८	२२१	३०१३	१३.६३३
२००५	४९०२५	४६५९७	०.९५०	६४५४	८६९१	१.३४६	२४२	२२५७	९.३२६
२००६	५००१५	४१३७९	०.८२७	६८१९	७७४४	१.१३५	२५९	२०९०	८.०६९
२००७	५२०८८	३८६०२	०.७४१	७४२४	८२४०	१.१०९	२७२	२४५२	९.०१४
२००८	५५०८३	३९७४९	०.७२१	८३२४	८२९७६	९.९६८	२७९	३११७	११.१७२
२००९	५७८३१	४४०३९	०.७६१	९२४०	१६८८७	१.८२७	२९५	७२२९	२४.५०५
२०१०	६१६५३	५७३०१	०.९२९	१०४५२	१७३८४	१.६६३	३१०	७१२८	२२.९९३
२०११	६४६७३	७१०४७	१.०९८	१२००१	१७९७२	१.४९७	३१९	५०६५	१५.८७७

(संदर्भ : संबंधित वर्षातील स्थुल NPA व बँक शाखांच्या अधारे तयार केलेले कोष्टक)

एकूण स्थुल अनिष्पादित मालमत्तेऐवजी प्रतिशाखा स्थुल अनिष्पादित मालमत्तेचा विचार केला असता असे दिसुन येते की विदेशी बँकांची प्रतिशाखा अनिष्पादित मालमत्ता (१५.८७७७४ **कोटी रू.**) भारतीय बँकांपेक्षा (१.०९८५६ **कोटी रू.** व १.४९७५४ **कोटी रू.**) अधिक आहे, भारतीय खाजगी बँका याबाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहेत आणि सार्वजनिक बँकांची प्रतिशाखा अनिष्पादित मालमत्ता इतर बँकांपेक्षा कमी आहे (कोष्टक क्र. ५).

कोष्टक क्र. ६ शाखांची संख्या व स्थुल अनिष्पादित मालमत्तेमधील सहसंबंध विश्लेषण

	राष्ट्रीययकृत बँका	खाजगी बँका	विदेशी बँका
सहसंबंध सहगूणक	.६८३	.१५३	.७२४*
महत्व मूल्य	.०६२	.७१८	.०४२
नमूने	८	८	८

राष्ट्रीययकृत बँका व खाजगी बँकाच्या बाबतीत शाखांची संख्या व स्थुल अनिष्पादित मालमत्ता यामधील सहसंबंध सहगूणक विश्लेषणाचे निष्कर्ष धनात्मक नाहीत तर विदेशी बँकाच्या बाबतीत सहसंबंध सहगूणक विश्लेषणाचे निष्कर्ष धनात्मक आहेत विदेशी बँकाच्या बाबतीत शाखाविस्ताराचा प्रभाव स्थुल अनिष्पादित मालमत्तेवर पडत आहे (कोष्टक क्र. ६).

५. महत्वाचे निष्कर्ष

भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध प्रकारच्या व्यापारी बँकांच्या अनिष्पादित मालमत्तेचा अभ्यास केल्यानंतर पुढील निष्कर्ष प्राप्त होतात.

१. भारतातील सार्वजनिक व्यापारी बँकांच्या स्थुल अनिष्पादित मालमत्तेत सन २००४-२०११ या काळात ५१५४१ कोटी रू. वरून ७१०४७ कोटी रू. पर्यंत वाढ झालेली आहे. या बँकांमधील प्रतिशाखा स्थुल अनिष्पादित मालमत्ता १.०६६४८ कोटी रू. वरून १.०९८५६ कोटी रू.पर्यंत वाढ झालेली आहे.

२. भारतातील सर्व खाजगी व्यापारी बँकांमधील स्थुल अनिष्पादित मालमत्ता सन २००४ ते २०११ या काळात १०३४३ कोटी रू. वरून १७९७२ कोटी रू.पर्यंत वाढ झालेली आहे, तर त्यांच्या प्रतिशाखा स्थुल अनिष्पादित मालमत्तेत १.७३८०३ कोटी रू. वरून १.४९७५४ कोटी रू पर्यंत वाढ झालेली आहे. सन २००८ मध्ये प्रतिशाखा स्थुल अनिष्पादित मालमत्ता ९.९६८२८ कोटी रू. एवढी उच्च राहीलेली आहे.

३. भारतातील विदेशी व्यापारी बँकांच्या स्थुल अनिष्पादित मालमत्तेत सन २००४-२०११ या काळात ३०१३ कोटी रू. वरून ५०६५ कोटी रू. पर्यंत वाढ झालेली आहे, तर त्यांची प्रतिशाखा स्थुल अनिष्पादित मालमत्ता १३.६३३४८ कोटी रू. वरून १५.८७७७४ कोटी रू. पर्यंत वाढलेली आहे. सन २००९ मध्ये प्रतिशाखा स्थुल अनिष्पादित मालमत्ता २४.५०५०८ कोटी रू. एवढी उच्च राहीलेली आहे.

४. भारतातील विविध व्यापारी बँकांच्या स्थुल अनिष्पादित मालमत्तेच्या रकमेच्या विचार करता विदेशी व्यापारी बँकांच्या अनिष्पादित मालमत्ता कमी आहेत तर सार्वजनिक व्यापारी बँकांच्या अनिष्पादित मालमत्ता सर्वाधिक आहेत आणि खाजगी व्यापारी बँका दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या दिसून येतात.

५. भारतातील सार्वजनिक व खाजगी व्यापारी बँकांच्या शाखा विदेशी बँकांच्या तुलनेत अधिक असल्यामुळे त्यांच्या प्रतिशाखा स्थुल अनिष्पादित मालमत्ता कमी दिसत असल्या तरी या बँकांच्या थकबाकीमध्ये वाढ होत आहे ही गंभीर बाब आहे (Aggarwal and Pillai, 2012).

६. भारतातील सार्वजनिक व्यापारी बँका शेती, शेतीसंलग्न उद्योग व अग्रक्रम क्षेत्रास कर्जपुरवठा करीत असल्याने थकबाकीचे प्रमाण वाढलेले आहे असे असले तरी खाजगी व विदेशी बँका जास्तीत जास्त कर्जपुरवठा उद्योग, व्यापार व सेवा क्षेत्रास करत असतानाही खाजगी व विदेशी बँकांनी वाटप केलेल्या कर्जाची थकबाकी वाढत आह ही देखील गंभीर बाब आहे.

७. राष्ट्रीययकृत बँका व खाजगी बँकाच्या बाबतीत शाखांची संख्या व स्थुल अनिष्पादित मालमत्ता यामधील सहसंबंध धनात्मक नाहीत मात्र विदेशी बँकाच्या बाबतीत सहसंबंध सहगूणक विश्लेषणाचे निष्कर्ष धनात्मक आहेत

७. अनिष्पादित मालमत्ता वाढीची कारणमिमांसा व उपाय

भारतीय बँक व्यवसायातील वाढत्या अनिष्पादित मालमत्तेची समस्या कमी करण्यासाठी बँक व्यवस्थापन व भारतीय रिझर्व्ह बँक प्रयत्न करीत असली तरी या समस्येची योग्य कारणमिमांसा करून त्यावर पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

१. भारतीय वित्तीय बाजारपेठेत अनिश्चीतता वाढत असल्याने विदेशी व खाजगी व्यापारी बँका मोठ्या प्रमाणात कर्जे वितरणावर भर देत आहेत. या बँकांच्या कर्जव्यवहारांचा अभ्यास करता असे दिसून येत आहे की, असुरक्षित कर्जव्यवहाराचे प्रमाण वाढत आहे. अशा कर्जामुळेच थकबाकीचे प्रमाणही वाढत आहे. यासाठी सर्वच बँकांनी कर्ज वाटपाची स्पर्धा टाळून सुरक्षित कर्जवाटप पद्धती अवलंबण्याची गरज आहे (Murinde and Yaseen,2004).

२. सार्वजनिक व्यापारी बँकांना अग्रक्रम क्षेत्रास कर्जपुरवठा करणे बंधनकारक आहे, परंतु अशी कर्जे थकबाकीत असल्यामुळे सार्वजनिक बँकांच्या अनिष्पादित मालमत्तेत वाढ होत आहे (Sen and Ghosh 2005). त्यासाठी अग्रक्रम क्षेत्राचा भार केवळ सार्वजनिक बँकावर न ठेवता काही प्रमाणात खाजगी व विदेशी बँकांनाही अग्रक्रम क्षेत्रास कर्जपुरवठा करण्याची वास्तविकरित्या सक्ती करण्याची आवश्यकता आहे केवळ आकडेवारीचा हिशेब सादर करण्यापेक्षा अधिक प्रमाणात कर्ज वितरन करुन सार्वजनिक बँकावरील भार कमीकरण्याची अवश्यकता आहे.

३. शेती व्यवसायात शेतीसाठी घेतलेल्या कर्जाचा काही प्रमाणात अनुत्पादक कारणासाठीही वापर केला जात असल्यामुळे शेतकऱ्यास शेतीकर्जे परतफेड करणे शक्य होत नाही; परिणामी शेतीकर्जाची थकबाकी वाढत आहे. नैसर्गीक आपत्ती व अनियंत्रित बाबी वगळता शेती कर्जाच्या प्रत्यक्ष वापरावर स्थानिक पातळीवर प्रभावी नियंत्रण निर्माण करण्याची गरज आहे.

४. उद्योग व व्यापार क्षेत्रास केला जाणारा कर्जपुरवठा पतक्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात केला जात असल्याने उद्योग व व्यापार क्षेत्रातील कर्जांचीही थकबाकी वाढत आहे (Rajeev, Meenakshi 2008). अशी थकबाकी कमी करण्यासाठी कर्जदाराची पतक्षमता तपासून योग्य निकषांची काटेकोर अंबलबजावणी करूनच कर्जवाटप होणे आवश्यक आहे.

५. व्यापारी बँकांची बुडीत मालमत्ता वाढणे धोकादायक असून कर्जदारास योग्य त्या सवलती देऊन अथवा सोईस्कर हप्ते बांधून देऊन अशी मालमत्ता कमीत कमी ठेवण्याची आवश्यकता आहे (Bhavani Prasad and Veena,2011)

६. थकबाकीतील कर्जे माफ करण्याचे धोरण सध्याच्या परिस्थितीत संवेदनक्षम बाब म्हणून स्वीकारलेले असले तरी अशा धोरणाची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्याची आवश्यकता आहे, कारण अशा धोणरामुळे कर्ज बुडवण्याची प्रवृत्ती वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. याऊलट कर्जदाराचे उत्पन्न वाढवून त्यास कर्ज फेडता येईल असे धोरण अवलंबने आवश्यक आहे.

सारांश

भारतात कार्यरत असणाऱ्या विविध व्यापारी बँकांमध्ये अनिष्पादित मालमत्तेची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून बँक व्यवस्थापन व भारतीय रिझर्व्ह बँक अनिष्पादित मालमत्ता कमी करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न करत असली तरी ही समस्या आवश्यक त्या पातळीपर्यंत सुटलेली नाही. भारतातील सार्वजनिक व्यापारी बँकांबरोबरच खाजगी व विदेशी बँकांमध्येही ही समस्या गंभीर बनत चाललेली आहे. शासकीय पातळीवर तात्पुरत्या उपाययोजना केल्या जात असल्या तरी ही समस्या सोडवण्यासाठी बँकांचे कर्जधोरण व कर्जाचे उपयोजन यामध्ये मुलगामी बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे.

संदर्भ सूची

1. Aggarwal and Pillai, (2012), Non-Performing Assest: Comparative Position of Public and Private Sector Banks in India, International Journal of Business and Management Tomorrow Vol. 2 No. 1, http://www.ijbmt.com/issue/142.pdf accessed on 21/07/2012
2. Bhavani Prasad and Veena (2011), NPAs Reduction Strategies for Commercial Banks in India, International Journal of Management & Business Studies, Vol. 1, Issue 3, September 2011, http://www.ijmbs.com/13/bhawani.pdf accessed on 25/05/2012
3. Chakravarty, S (1985). Report of the Committee to Review the Working of the Monetary System. Mumbai: Reserve Bank of India.
4. Falguni Shastri (2007) Restructuring of Indian Banks, Book -enclave, Jaypur
5. Johanson , (2002),Development Issues of Indian Economy Mascarenhas, Manan Prakashan, Mumbai,
6. Lalwani S. J. (1993), Changing profile of Indian Banking, Radha Publication, New Delhi,
7. Murinde, V., & Yaseen, H. (2004). The Impact of Basle Accord Regulations on Bank Capital and Risk Behavior: 3D Evidence from the Middle East and North Africa (MENA) Region, 3rd International Conference of the Centre for Regulation and Competition (CRC) on “Pro-Poor Regulation & Competition: Issues, Policies and Practices”.
8. Rajeev M and Mahesh H P , (2010), Banking Sector Reforms and NPA: A study of Indian Commercial Banks, Working Paper 252, http://www.isec.ac.in/WP%20252%20-%20Meenakshi%20Rajeev%20and%20H%20P%20Mahesh.pdf accessed on 05/06/2012
9. Rajeev, Meenakshi (2008). Small Scale Industries Sector in India. In Prof Nelson Ndubisi (ed), SME Development and Practices in Asia Pacific RIM. Malaysia: Arah Publishers.
10. Reddy Prashanth K (2002), A comparative study of Non Performing Assets in India in the Global context - similarities and dissimilarities, remedial measures, http://unpan1.un.org/intradoc/groups/public/documents/apcity/unpan013132.pdf accessed on 12/05/2012
11. Sen Sunanda and S K Ghosh (2005). Basel Norms, Indian Banking Sector and Impact on Credit to SMEs and the Poor. Economic and Political Weekly, 14 (12): 1167-80.

12. Shyamala A. (2012), NPAs In Indian Banking Sector: Impact On Profitability, Indian Streams Research Journal, Vol.1,Issue.V, June; 12pp.1-4 http://www.isrj.net/PublishArticles/887.pdf accessed on 26/07/2012
13. Siraj. K.K and Pillai P S (2012), A Study on the Performance of Non-Performing Assets (NPAs) of Indian Banking During Post Millennium Period, International Journal of Business and Management Tomorrow, Vol. 2 No. 3, http://www.ijbmt.com/issue/278.pdf accessed on 21/07/2012
14. RBI, (2010), Basic Statistics of Banking in India, 2010.
15. RBI, (2011), Annual Report, 2004, 2006, 2009, 2010, 2011.
16. RBI, (2011), Statistical Tables Relating to Banks in India, 2011.
17. www.banknet.in
18. www.rbi.org.in